॥ गणपती बाप्पा मोरया ॥

पश्चिम विदर्भातील सर्वाधिक अग्रगण्य सायं दैनिक

# सिटी न्यूज सुपरफास्ट

अमरावती

• वर्ष १ • अंक १२० • बुधवार, दि. २३ सप्टेंबर २०२६ • मूल्य ३ • पृष्ठे ४

RNI No.- MHAR/ 26 / A2977 Postal Regn. No. AKL DN /283 / 2024-2026 Web.http://epaper.citynewssuperfast.com

॥ गणपती बाप्पा मोरया ॥

## »थोडक्यात

### अमित शाह, ज्ञानेश कुमारने देशाचे वाटोळे केले : खा. राऊत



मुंबई : मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार अत्यंत बेकायदेशीर पद्धतीने निवडणूक आयोगाचा कारभार करतायत हे देशाच्या लोकशाहीसाठी अत्यंत घातक आहे आणि झालेलं आहे. देशाचे गृहमंत्री अमित शाह यांच्या अधिपत्याखाली निवडणूक आयोग येतो. याचा अर्थ ज्ञानेश कुमार यांनी गृहमंत्री अमित शाह यांच्या सूचनेनुसार, आदेशाने आणि त्यांच्या दबावाखाली संगनमताने लोकशाहीच्या हत्येचं, देशातलं संविधान संपवण्याचं गुन्हेगारी स्वरूपाचं कृत्य त्यांनी केलं असल्याचा हल्लाबोल शिवसेना खासदार संजय राऊत यांनी केला. अमित शाह आणि ज्ञानेश कुमारने मिळून या देशाचं वाटोळं केलेलं आहे.

# शिक्षण विभागात 'आसिफ' चा सुळसुळाट!

## बोगस शिक्षक, संस्था चौकशी बाहेर असल्याची ओरड

प्रतिनिधी २३ सप्टेंबर

**अकोला :** अमरावती विभागाच्या पथकाकडून शालार्थ आयडी घोटाळ्याची कसून चौकशी सुरू असतानाच, अकोला जिल्हा परिषद शिक्षण विभागातून एक अत्यंत संतापजनक आणि खळबळजनक प्रकार समोर आला आहे. एका बाजूला एसआयटी आणि वरिष्ठ अधिकारी कागदपत्रांची छाननी करत असल्याचा दावा करत आहेत, तर दुसऱ्या बाजूला प्रत्यक्षात मात्र अकोल्यात सर्व काही कागदावरच सुरू असून प्रत्यक्षात तपासणी शून्य असल्याचे दिसून येत आहे. या सर्व प्रकारात 'आसिफ' नावाचा एक अनधिकृत खाजगी व्यक्ती शिक्षण विभागात मुख्य सूत्रधार बनून वावरत असून, त्याच्या हातात अनेकांच्या नोकऱ्या आणि फाईल्सचे व्हेरिफिकेशन करण्याचे अधिकार कसे आले, असा संतप्त सवाल आता उपस्थित होत आहे.

### अमरावतीचे पथक आणि अकोल्यात चुप्पी

शालार्थ आयडी घोटाळ्याच्या पार्श्वभूमीवर वैयक्तिक मान्यता, व्हॅकन्सीची जाहिरात, संस्थाचालकांचा ठराव, आणि नियुक्ती आदेशाच्या कॉपीचा शोध घेण्यासाठी एसआयटी व तपास पथके सक्रिय झाली आहेत. अमरावती येथून आलेल्या तपास पथकाने या प्रकरणी गंभीर दखल घेतली असली, तरी अकोला जिल्हा परिषद शिक्षण विभागात मात्र या संपूर्ण प्रक्रियेला फाटा देण्यात आला आहे. कार्यालयात कुणी अधिकृत व्यक्ती नसताना एका खाजगी व्यक्तीच्या, म्हणजेच 'आसिफ'च्या हातात शिक्षकांच्या फाईल्स तपासण्याचे काम सोपवण्यात आल्याची चर्चा आहे. शिक्षण विभागाच्या आवारात त्याची सतत उठबस असते आणि तोच सर्व फाईल्सची आणि इतर देवाणघेवाण करतो, असा आरोप केला जात आहे.




### नेमका कोण हा आसिफ? आणि कोणाचा वरदहस्त?

अकोल्यातील शिक्षण वर्तुळात सध्या एकच चर्चा रंगली आहे ती म्हणजे - हा 'आसिफ' नेमका कोण? शिक्षण विभागाचा कोणताही शासकीय संबंध नसताना, तो शिक्षकांच्या फाईल्स कसे काय तपासू शकतो ? खाजगी शिक्षकांना फाईल्स व्हेरिफिकेशनच्या नावाखाली मोठ्या प्रमाणावर त्रास दिला जात असल्याच्या तक्रारी समोर येत आहेत. इतकेच नाही तर बडी रक्कम मागितल्या जात असल्याची ओरड शिक्षक खाजगीत करत आहे. शिक्षकांना नोकरी टिकवण्यासाठी किंवा शालार्थ आयडी मिळवण्यासाठी आर्थिक फटक्याला सामोरे जावे लागत असून, आसिफमार्फत वसुली होत असल्याचा गंभीर संशय व्यक्त केला जात आहे. विशेष म्हणजे, जिल्हा परिषद शिक्षण अधिकाऱ्यांच्या आशीर्वादाशिवाय हा सर्व खेळ चालणे अशक्य असल्यामुळे, यामागे नेमका कोण मोठा मासा आहे, हे उघडकीस येणे गरजेचे आहे.

### कागदोपत्री आदेश अन् प्रत्यक्षात 'शून्य' तपासणी

कार्यालय, शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, अकोला यांच्याकडून काढण्यात आलेल्या पत्रानुसार, शाळांमधील शिक्षकांच्या वैयक्तिक मान्यतेची मूळ कार्यालयीन प्रत जमा करण्याचे आदेश दिले होते. मात्र, या आदेशाच्या आडोशाने निव्वळ काही मोजक्याच (केवळ २९७) शिक्षकांची कागदपत्रे तपासल्याचा आव आणला जात आहे का ? जिल्ह्यातील इतर हजारो शिक्षकांच्या फाईल्सचे काय ? ज्यात अनेक बोगस शिक्षक असून त्यांचे काय, असा सवाल विचारला जात आहे. केवळ कागदी घोडे नाचवून मूळ घोटाळा झाकण्याचा प्रयत्न केला जात असल्याचा आरोप होत आहे.

### मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी लक्ष द्यावे

या संपूर्ण प्रकरणाची व्याप्ती पाहता, शिक्षण विभागातील दलाली आणि खाजगी व्यक्तींचा वावर थांबवण्यासाठी आता जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी तातडीने कठोर पावले उचलण्याची गरज निर्माण झाली आहे. जर या प्रकरणाची सखोल आणि निष्पक्ष चौकशी झाली नाही, तर जे बोगस शिक्षक आहे त्यांच्या फाईल्स चेकच होणार नाही. आणि अकोल्यातील हजारो पात्र शिक्षकांचे भविष्य या 'सेटिंग मास्टर'च्या हातात अडकून पडेल. अशी भिती व्यक्त केली जात आहे. शालार्थ आयडी घोटाळ्याची ही चौकशी खरोखरच निष्पक्ष होणार का, की नेहमीप्रमाणे ती थंडबस्त्यात टाकली जाणार, याकडे संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागून आहे.

# दोन दिवसात दुष्काळाचा 'जीआर' काढणार : मुख्यमंत्री

प्रतिनिधी २३ सप्टेंबर

**लातूर :** राज्यातील दुष्काळी परिस्थिती आणि मराठवाड्याच्या पाणी प्रश्नावरून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मोठी आणि महत्त्वाची माहिती दिली आहे. सरकारने दुष्काळ अतिशय गांभीर्याने घेतला असून, येत्या दोन दिवसांत दुष्काळाची पहिली अधिसूचना काढण्यात येईल. शासन या गंभीर काळात शेतकऱ्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे असून, मराठवाड्याला दुष्काळमुक्त करण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत, अशी ग्वाही देवेंद्र फडणवीस यांनी दिली आहे. तसेच, मराठवाडा वॉटर ग्रिड प्रकल्पावरून त्यांनी महाविकास आघाडी सरकारवर जोरदार निशाणा साधला.

राज्यातील दुष्काळसदृश परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आज बुधवारी लातूर, धाराशिव आणि सोलापूर जिल्ह्यांच्या दौऱ्यावर आहेत. या दौऱ्यात त्यांनी आज लातूर जिल्ह्यातल्या जाऊ गावात पोहचलेत. आता रब्बीसाठी शक्य ती मदत करू, बळीराजासाठी सर्व काही करू, सगळ्यांची कर्जमाफी झाल्याशिवाय थांबणार नाही, असा निर्धार व्यक्त केला. यावेळी मुख्यमंत्र्यांसमोर व्यथा मांडताना शेतकऱ्यांना अक्षरशः रडू कोसळले.



फडणवीस यांनी दुष्काळग्रस्त जाऊ गावातील पीक परिस्थिती, पाण्याची उपलब्धता याची पाहणी केली. शेतकऱ्यांशी संवाद साधला. शेतकऱ्यांना उभे करण्यासाठी सर्व काही करू, असे आश्वासन त्यांनी यावेळी दिले. राज्य सरकारने दुष्काळी परिस्थितीचा आढावा घेण्यासाठी प्रशासनाला पंचनामे सुरू करण्याचे निर्देश दिले आहेत.

### मविआने वॉटर ग्रिड प्रकल्प गुंडाळला!

पत्रकारांनी मराठवाडा वॉटर ग्रिड प्रकल्पाबाबत विचारलेल्या प्रश्नाला उत्तर देताना फडणवीसांनी विरोधकांवर थेट हल्लाबोल केला. मराठवाडा वॉटर ग्रिड हा अतिशय महत्त्वाकांक्षी प्रकल्प होता. मात्र, महाविकास आघाडीचे सरकार आल्यानंतर त्यांनी हा प्रकल्प बंद केला आणि गुंडाळून ठेवला. दुर्दैवाने, केंद्र सरकारने जल जीवन मिशनअंतर्गत दिलेला निधी वॉटर ग्रिडसाठी वापरणे शक्य होते, मात्र तो वेगळ्या पद्धतीने वापरला गेला. त्यामुळे हा प्रश्न पुन्हा निर्माण झाला आहे, असा आरोप त्यांनी केला.

### शेतकऱ्यांसाठी निधी कमी पडू देणार नाही

दुष्काळ निवारणाच्या उपाययोजनांबद्दल बोलताना फडणवीस म्हणाले की, दुष्काळाबाबतचे सर्व अहवाल आम्ही गोळा केले असून त्यानुसार कारवाई सुरू आहे. शेतकऱ्यांना मदत तर करणारच आहोत, पण सोबतच आमची कर्जमाफीची प्रक्रियाही सुरू राहील. ती कुठेही बंद केली जाणार नाही. पिण्याचे पाणी, जनावरांचा चारा यासाठी लागणाऱ्या अतिरिक्त निधीची तजवीज आम्ही करत आहोत, त्यामुळे कुठेही निधीची कमतरता पडू देणार नाही.

# बाळापूर तालुक्यातील हातरूण येथे 37 वर्षीय युवकाचा संशयास्पद मृत्यू

प्रतिनिधी २३ सप्टेंबर

**बाळापूर :** अकोला जिल्ह्यातील बाळापूर तालुक्यातील उरळ पोलीस स्टेशनच्या हद्दीत येणाऱ्या ग्राम हातरूण येथे एक अत्यंत संशयास्पद व दुर्दैवी घटना उघडकीस आली आहे. येथील ३७ वर्षीय तरुण शेख जुनैद शेख मुख्तार यांचा राहत्या घरी मध्यरात्रीच्या सुमारास संशयास्पद स्थितीत मृत्यू झाल्याची घटना समोर आली आहे.

या अचानक घडलेल्या प्रकारामुळे हातरूण गावात आणि परिसरात तीव्र शोककळा पसरली असून सर्वत्र हळहळ व्यक्त होत आहे.

पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, मंगळवारी रात्री साधारणपणे दोन वाजूीच्या सुमारास शेख जुनैद शेख मुख्तार हे आपल्या राहत्या घराच्या किचन रूममध्ये (स्वयंपाकघर) लोखंडी सळीच्या साहाय्याने गळफास घेतलेल्या अवस्थेत आढळले. हे दृश्य पाहताच त्यांच्या पत्नीने तातडीने घाबरून जाऊन आरडाओरडा केला.



पत्नीचा आवाज ऐकून तिथे धावून आलेल्या त्यांच्या भावांनी जुनैद यांना तत्काळ खाली उतरवले. कुटुंबीयांनी अत्यंत गंभीर व तातडीच्या परिस्थितीत जुनैद यांना उपचारासाठी अकोला येथील शासकीय रुग्णालयात हलवले. परंतु, रुग्णालयात पोहोचल्यानंतर वैद्यकीय अधिकाऱ्यांनी तपासणी करून त्यांना मृत घोषित केले. या घटनेची माहिती मिळताच उरळ पोलीस तात्काळ घटनास्थळी व रुग्णालयात दाखल झाले.

पोलिसांनी मृताचा शवविच्छेदन अहवाल मागितला असून प्राथमिक तपासात डॉक्टरांनी गळफास घेतल्याचे नमूद केले आहे. मृतदेहाच्या गळ्याभोवती दोरी किंवा इतर खुणा असल्याचे तपासात समोर आले आहे. घटनास्थळावरून व नातेवाईकांच्या जबानीवरून पोलीस या प्रकरणाचा सर्व बाजूने कसून तपास करत आहेत. प्राथमिक दृष्ट्या हा घातपात आहे की आत्महत्या, याबाबत पोलीस सखोल निष्कर्षापर्यंत पोहोचण्याचा प्रयत्न करत आहेत. या अकल्पित घटनेमुळे मृत जुनैद यांच्या कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला असून संपूर्ण गावात शोककळा पसरली आहे.

# संकटात शेतकऱ्यांना एकटं सोडू नका - उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार

प्रतिनिधी २३ सप्टेंबर

**मुंबई :** राज्यातील दुष्काळसदृश्य परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी कॉँग्रेस पक्षाच्या राष्ट्रीय अध्यक्षा आणि उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांनी पक्षातील सर्व मंत्री, पालकमंत्री, खासदार, आमदार, माजी आमदार तसेच प्रमुख पदाधिकाऱ्यांना शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन प्रत्यक्ष नुकसानाची पाहणी करण्याचे स्पष्ट शब्दांत निर्देश दिले. नैसर्गिक संकटाच्या काळात शेतकऱ्यांना एकटे सोडू नका. त्यांच्या अडचणी प्रत्यक्ष जाणून घ्या, नुकसानग्रस्त भागांची पाहणी करा आणि आवश्यक प्रशासकीय मदत मिळवून देण्यासाठी तत्परतेने पाठपुरावा करा, अशा सूचना सुनेत्रा पवार यांनी बुधवारी दिल्या.राष्ट्रवादी कॉँग्रेस पक्ष आणि पक्षातील प्रत्येक पदाधिकारी, लोकप्रतिनिधी व कार्यकर्ता हा शेतकऱ्यांच्या अडचणीच्या काळात त्यांच्यासोबत आहे, हा विश्वास शेतकऱ्यांमध्ये निर्माण करण्याचे आवाहनही सुनेत्रा पवार यांनी केले. नुकतीच मंत्रिमंडळाची बैठक पार पडली. त्यानंतर कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनीही संदेश दिला होता.

# सातारा परिसरात रात्रीत भूकंपाचे पाच सौम्य धक्के!

**कोयनानगर :** सातारा वेधशाळेत मंगळवार, २२ रोजी रात्रीत भूकंपाचे पाच सौम्य धक्के नोंदविण्यात आले. सातारा भूकंप वेधशाळेतील एमइक्यू डिजिटल भूकंप मापन यंत्रावर या धक्क्यांची नोंद झाली आहे. वेधशाळेच्या नोंदीनुसार, पहिला धक्का मध्यरात्री १२ वाजून ३६ मिनिटांनी जाणवला. त्याची तीव्रता २.१ रिश्टर स्केल इतकी होती. त्यानंतर ०१ वाजून २० मिनिटांनी २.३, ०३ वाजून १६ मिनिटांनी २.३, तर ०३ वाजून २९ मिनिटांनी २.४ रिश्टर स्केल तीव्रतेचा धक्का नोंदविण्यात आला.

# राधाकृष्ण विखे-पाटलांनी मनोज जरांगेंना हप्ता दिला : डॉ.संजय लाखे

प्रतिनिधी २३ सप्टेंबर

जालना : राधाकृष्ण विखे पाटील यांनी छत्रपती संभाजीनगरच्या गॅलेक्सी रुग्णालयात जाऊन मनोज जरांगे यांना हप्ता पुरवला. विखे-पाटील यांच्या सांगण्यावरुनच मनोज जरांगे यांनी एकनाथ शिंदे यांच्या बदनामीची सुपारी घेतली, असा आरोप मराठा राज्य समन्वयक तथा शिवसेना प्रवक्ते डॉ. संजय लाखे पाटील यांनी केला. ते बुधवारी जालना येथे प्रसारमाध्यमांशी बोलत होते. यावेळी त्यांनी जरांगे पाटील यांच्यावर टीकास्त्र सोडले. गरीब मराठ्यांचा आणि मनोज जरांगे पाटील यांचा संबंध राहिला नाही, असे त्यांनी म्हटले. मनोज जरांगे पाटील यांनी मंगळवारी झालेल्या पत्रकार परिषदेत एकनाथ शिंदे यांना पुन्हा एकदा लक्ष्य केले होते. यानंतर संजय लाखे पाटील यांनी जरांगे यांच्या वक्तव्याचा समाचार घेतला. मनोज जरांगे आणि गरीब मराठा समाजाचा काहीही संबंध राहिला नसून विखे पाटलांनी हॉस्पिटलमध्ये हप्ता पुरवल्याने आणि जरांगे यांनी पुन्हा एकदा एकनाथ शिंदे यांच्यावर टीका केली.

# वशिलेबाजी, बोगसगिरी विरोधात पालकांचा पुण्यात दांगडो

## फेरी तात्पुरती स्थगित, चौकशी झाली सुरु कृषी पदव्युत्तर प्रवेश प्रक्रियेत बोगसगिरीचा आरोप

प्रतिनिधी २३ सप्टेंबर

**अकोला/ पुणे :** महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषदेच्या अंतर्गत राज्यील सर्व कृषी व संलग्न विद्यापीठांच्या कृषी पदव्युत्तर (श्.एम्. Agग्म्ल्तूल्rI) प्रवेश २०२६-२७ च्या तिसऱ्या प्रवेश फेरीत मंगळवारी मोठा गोंधळ उडाला. प्रवेश प्रक्रियेत नियमबाह्य व बोगस कारभार होत असल्याचा आरोप करत अकोल्याहून आलेल्या विद्यार्थी व पालकांनी पुणे येथील परिषदेच्या कार्यालयात जोरदार विरोध व ठिय्या आंदोलन केले. या दांगडो आणि गोंधळामुळे परिषदेला मंगळवारच्या कृषी पदव्युत्तर तिसऱ्या प्रवेश फेरीत तात्पुरती स्थगिती द्यावी लागली. या प्रवेश प्रक्रियेत वशिलेबाजी झाली काय याची चौकशी होण्याची गरज असून पारदर्शक प्रक्रिया व प्रवेश प्रक्रियेत चुकीचे मापदंड लावल्याचा आरोप आहे.



प्रवेश प्रक्रियेदरम्यान पारदर्शकता नसणे, नियमांना डावलून विद्यार्थ्यांना प्रवेश देणे तसेच परीक्षा न दिलेल्या उमेदवारांना प्रवेशात बेकायदेशीरपणे समाविष्ट करणे, असे गंभीर आरोप विद्यार्थ्यांनी व पालकांनी केले.

अकोल्याचे विद्यार्थ्यांचे पालक मनीष मोहोड (रा. दत्तवाडी, लहान उमरी, अकोला) आणि इतर विद्यार्थ्यांच्या तक्रार अर्जानुसार, अनेक त्रुटी असतानाही संबंधित विभागाने नव्याने फॉर्म भरून घेत नवीन गोंधळ निर्माण केला आहे. तसेच पहिल्या फेरीतील प्रवेशावर आक्षेप घेत 'कन्व्हर्जन' पद्धतीमध्ये घोळ केल्याचा आरोप विद्यार्थ्यांनी केला.

विद्यार्थ्यांनी दिलेल्या सामूहिक तक्रार अर्जावर आणि आक्षेपांवर १५ दिवसांच्या आत योग्य तो निर्णय घेण्याचे लेखी आश्वासन महासंचालक राहुल महिवल यांनी दिले. या आश्वासनानंतर रात्री उशिरा अकोल्याहून आलेल्या विद्यार्थी व पालकांनी आपले आंदोलन थांबवले. या संपूर्ण प्रकारामुळे कृषी प्रवेश प्रक्रियेतील पारदर्शकतेचा प्रश्न ऐरणीवर आला असून, चौकशीत काय निष्पन्न होते याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

### शिक्षण संचालक चौकशीच्या फेऱ्यात

कृषी परिषदेचे शिक्षण संचालक डॉ. किशोर शिंदे (मुळ आस्थापना सहाय्यक प्राध्यापक, कृषी विद्यापीठ,अकोला) यांच्या नियंत्रणाबाहेर परिस्थिती गेल्याने अखेर रात्री उशिरा पोलिसांना बोलवावे लागले. वाढता रोष आणि प्रश्नांची सरबत्ती पाहून शिक्षण संचालक डॉ. किशोर शिंदे आणि इतर अधिकारी अडचणीत सापडले असून या संपूर्ण प्रकरणाची सखोल चौकशी सुरू झाली आहे. विद्यार्थ्यांच्या तीव्र आंदोलनानंतर कृषी परिषदेचे महासंचालक राहुल महिवल यांनी स्वतः उपस्थित राहून विद्यार्थ्यांची बाजू ऐकून घेतली.

# खासगी वाहनातून वाशिमच्या दिशेने नेल्याचा वाकोडे कुटुंबीयांचा दावा!

## उपोषणासाठी मुंबईत थांबण्याचा निर्धार

प्रतिनिधी २३ सप्टेंबर

**मुंबई :** आयआयटी मुंबईतील विद्यार्थी साहिल वाकोडे याच्या मृत्यूप्रकरणी न्यायाच्या मागणीसाठी मुंबईत उपोषण करण्याचा निर्धार केलेल्या त्याच्या आई-वडिलांना बुधवारी रात्रीच्या सुमारास खासगी वाहनातून मुंबईबाहेर नेण्यात आल्याचा आरोप कुटुंबीयांनी केला आहे. पोलिसांना मुंबईतच थांबण्याची इच्छा व्यक्त करूनही आपल्याला घरी सोडण्याच्या नावाखाली विदर्भात नेण्यात आल्याचा दावा साहिलचे वडील रवींद्र वाकोडे यांनी केला.

बुधवारी पहाटेच्या सुमारास हे कुटुंब वाशिम जिल्ह्यातील कारंजा लाड परिसरात पोहोचले. मात्र तेथून आता पुन्हा माघारी येणार असल्याचे त्यांनी जाहीर केले. साहिलचे आई-वडील आणि त्यांचे वकील निखिल कांबळे यांनी बुधवारी सायंकाळी वांद्रे येथील गुन्हे शाखेच्या कार्यालयाला भेट दिली. तेथून वाकोडे कुटुंबियाने पवईतील आयआयटी मुंबईच्या प्रवेशद्वाराबाहेर माध्यमांशी संवाद साधला होता. त्यानंतर आयआयटीच्या गेटजवळून निघाल्यानंतर त्यांना सोडतो असे पोलिसांकडून सांगण्यात आले. त्यानंतर गाडी समृद्धी महामार्गावर लागल्यावर खासगी वाहनातून पुढे पाठवण्यात आले.

माझा त्याला विरोध होता. मात्र तुम्हाला घरी सोडतो असे सांगून पोलिसांनी नेले, असे वाकोडे म्हणाले. मात्र जोपर्यंत आरोपींना अटक होत नाही तोपर्यंत आंदोलन सुरू राहणार आहे. मी कारंजा लाड येथून माघारी मुंबईच्या दिशेने येत आहे, असे वाकोडे म्हणाले. दरम्यान, आपण पुन्हा मुंबईला परतणार असून आयआयटी मुंबईसमोर उपोषण करण्याचा निर्धार कायम असल्याचे रवींद्र वाकोडे यांनी सांगितले. मला माझ्या मुलासाठी न्याय हवा आहे. पाच दिवस होऊनही आरोपींना अटक झाली नाही, असा आरोप त्यांनी केला.



# उशीर होतो... पण जे मिळतं, ते इतिहास बनतं!

जन्मतारीख: ८, १७, २६ अंक: ८ अधिपती: शनी
अंकशास्त्रात मूलांक ८ म्हणजे शनीचा अंक मानला जातो.
शनी म्हणजे शिस्त, कर्म, जबाबदारी, न्याय, संयम आणि विलंब.
म्हणूनच मूलांक ८ ची कहाणी इतरांपेक्षा थोडी वेगळी असते.
यांना गोष्टी सहज मिळत नाहीत...
पण जे मिळतं, ते टिकवण्याची ताकद त्यांच्यात असते.
त्यांचा प्रवास अनेकदा सरळ नसतो. अडथळे येतात, विलंब होतो, लोक गैरसमजून घेतात... पण मूलांक ८ ची खरी ताकद इथेच दिसते —
“परिस्थिती कितीही कठीण असो... हा माणूस पुन्हा उभा राहतो.”

## शनीची एक खास शिकवण

मूलांक ८ च्या व्यक्तीला आयुष्य एक गोष्ट वारंवार शिकवतं —
मेहनत करा. संयम ठेवा.
चुकीचा मार्ग निवडू नका.
आणि वेळेवर विश्वास ठेवा. कारण अंकशास्त्रीय मान्यतेनुसार शनीचा मार्ग वेगाचा नसतो...
तो असतो — हळूहळू, पण खोलवर पाया तयार करण्याचा. म्हणून मूलांक ८ च्या आयुष्यातील यश अनेकदा एका दिवसात दिसत नाही.
पण वर्षानुवर्षांची मेहनत एकत्र आली की त्याची ताकद जाणवते.

## प्रेम आणि नाती — एक वेगळीच बाजू

मूलांक ८ व्यक्ती कडक दिसली तरी मनाने ती अनेकदा खूप प्रेमळ आणि उदार असते. जवळच्या माणसांसाठी ती खूप काही करू शकते. पण एक विचित्र गोष्ट घडते... सगळ्यांच्या अडचणीच्या वेळी ती उभी राहते, पण स्वतःच्या अडचणीच्या वेळी कधी कधी तिच्याजवळ कोणीच नसतं. करिअर, जबाबदाऱ्या आणि ध्येय यामध्ये ती इतकी गुंतते की नात्यांना वेळ कमी मिळू शकतो. आणि विश्वासघात झाला तर तो विसरणं तिला सोपं जात नाही.

## मूलांक ८ ची मानसिक ताकद

मूलांक ८ असलेली व्यक्ती बाहेरून कणखर दिसते. पण तिच्या आयुष्यात किती संघर्ष झाले आहेत, हे प्रत्येकाला माहीत असेलच असं नाही. ती प्रत्येक वेळी आपलं दुःख सांगत बसत नाही. पडली तरी स्वतःच उठते. दुखावली तरी स्वतःला सावरते. आणि अपयश आलं तरी पुन्हा प्रयत्न करते. म्हणूनच मूलांक ८ साठी एक वाक्य अगदी योग्य वाटतं — “माझ्या संघर्षांची संख्या मोजू नका... मी किती वेळा पुन्हा उभा राहिलो ते बघा.”




## मूलांक ८ — मेहनतीची किंमत

मूलांक ८ व्यक्तीला shortcut पेक्षा मेहनत, शिस्त आणि परिणाम यावर विश्वास असतो. काम हातात घेतलं की ते व्यवस्थित पूर्ण करण्याची इच्छा असते. कधी कधी याच परिपूर्णतेमुळे वेळ जास्त लागतो. पण त्याला घाईघाईने मिळालेल्या यशापेक्षा मजबूत पाया अधिक महत्त्वाचा वाटतो.

## मूलांक ८ ची काही प्रसिद्ध उदाहरणे

नरेंद्र मोदी — १७ सप्टेंबर १७ = १ + ७ = ८
नरेंद्र मोदी यांचा जन्म १७ सप्टेंबर १९५० रोजी झाला. त्यांच्या अधिकृत चरित्रात त्यांच्या सुरुवातीच्या जीवनातील मेहनत, संघटनात्मक काम आणि प्रशासकीय अनुभवाचा उल्लेख आहे; ते २०१४ मध्ये भारताचे पंतप्रधान झाले.
मूलांक ८ च्या संदर्भातून पाहिलं तर त्यांच्या सार्वजनिक प्रवासात दीर्घकालीन ध्येय, संघटन, सातत्य आणि कठोर परिश्रम यांसारखे गुण अभ्यासता येतात. लहान सुरुवातीपासून मोठ्या जबाबदारीपर्यंतचा प्रवास आपल्याला एक गोष्ट सांगतो “मोठं ध्येय असेल, तर छोट्या सुरुवातीची लाज बाळगू नका.”

### डॉ. मनमोहन सिंग — २६ सप्टेंबर

२६ = २ + ६ = ८
डॉ. मनमोहन सिंग यांचा जन्म २६ सप्टेंबर १९३२ रोजी झाला. ते अर्थशास्त्रज्ञ, भारताचे १४वे पंतप्रधान आणि दीर्घ शैक्षणिक व प्रशासकीय कारकिर्दीचे व्यक्तिमत्त्व होते. त्यांच्या अधिकृत चरित्रात त्यांची अभ्यासू वृत्ती, मेहनत आणि शैक्षणिक दृष्टिकोन विशेष नमूद केला आहे. त्यांच्या प्रवासात मूलांक ८ शी जोडले जाणारे शिस्त, सातत्य, अभ्यासू वृत्ती आणि जबाबदारी हे पैलू पाहता येतात. शांतपणे काम करत राहणं... आणि परिणाम काळाला बोलू देणं.

### मदर तेरेसा — २६ ऑगस्ट

२६ = ८
मदर तेरेसा यांचा जन्म २६ ऑगस्ट १९१० रोजी झाला आणि १९७९ मध्ये त्यांना नोबेल शांतता पुरस्कार मिळाला; त्यांनी गरजू आणि गरीब लोकांच्या सेवेसाठी आपले जीवन समर्पित केले.

### सौरव गांगुली — ८ जुलै

८ = मूलांक ८
भारतीय क्रिकेट संघाचे माजी कर्णधार आणि क्रिकेट प्रशासक म्हणून ओळखले जाणारे गांगुली त्यांच्या नेतृत्वाच्या शैलीसाठी प्रसिद्ध राहिले; २०१९ मध्ये ते BCCI चे अध्यक्ष झाले.

### आशा भोसले — ८ सप्टेंबर

८ = मूलांक ८
भारतीय संगीतविश्वातील अत्यंत प्रदीर्घ आणि यशस्वी कारकिर्दीचा

साइना नेहवाल — १७ मार्च
अनिल कुंबळे — १७ ऑक्टोबर मूलांक ८ अल्लू अर्जुन — ८ एप्रिल

## मूलांक ८ — Boons

**महत्त्वाकांक्षा आणि ध्येयवेड**
शिस्त, संयम आणि सातत्य, व्यवहारिक व दूरदृष्टीचा विचार, व्यवस्थापन आणि आर्थिक समज, अडचणींमधून पुन्हा उभं राहण्याची ताकद

## मूलांक ८ — Curses

कामात इतकं गुंतणं की स्वतःसाठी वेळ कमी पडणे भावना मनात ठेवणे, सगळं स्वतःच्या पद्धतीने करण्याची इच्छा, विश्वासघात आणि अपयश मनावर घेणे, यशाच्या धावपळीत एकटेपणा

## मूलांक ८ ची सर्वात मोठी अंतर्गत लढाई

“मी इतकं देतोय...मग माझ्या वाट्याला उशीरच का?”हीच कदाचित मूलांक ८ ची सर्वात मोठी परीक्षा असते. पण त्याच वेळी त्याच्यासाठी सर्वात मोठा धडा देखील. उशीर म्हणजे अपयश नाही. उशीर म्हणजे अजून तयारी बाकी आहे.

## मनाचा एक न दिसणारा कोपरा...

मूलांक ८ व्यक्ती अनेकदा इतरांना मजबूत दिसते. पण तिलाही कौतुक हवं असतं.तिलाही कुणीतरी म्हणावं असं वाटतं —“तू खूप काही सहन केलंस... आणि तरीही तू थांबला नाहीस.” पण ती हे स्वतःहून सांगत नाही. ती पुन्हा कामाला लागते. कारण तिच्यासाठी भावना व्यक्त करण्यापेक्षा जबाबदारी पूर्ण करणं महत्त्वाचं वाटू शकतं. मूलांक ८ ला शिस्तबद्ध जीवनशैली, नियोजन आणि व्यवस्थित काम करण्याची पद्धत उपयोगी ठरते. व्यायाम, चालणे, योग, खेळ किंवा शारीरिक हालचाल यामुळे दैनंदिन ताण कमी करण्यास मदत होऊ शकते. त्याचबरोबर एक गोष्ट लक्षात ठेवणं गरजेचं — आयुष्य फक्त ध्येय गाठण्यासाठी नाही... ते जगण्यासाठीही आहे. अंकशास्त्रीय दृष्टिकोनातून मूलांक ८ च्या व्यक्तींना व्यवस्थापन, व्यवसाय, प्रशासन, वित्त, कायदा, मालमत्ता, संघटन, नियोजन आणि जबाबदारीची क्षेत्रे आकर्षक वाटू शकतात. पैशाबाबत त्यांच्यात नियोजन आणि व्यवस्थापनाची क्षमता असू शकते. पण एक धोका —काम, पैसा आणि ध्येय यांच्यामागे धावताना स्वतःचा आनंद आणि नाती मागे राहू नयेत. मेहनत + शिस्त + संयम = मजबूत यश

## मूलांक ८ ची खरी कहाणी...

मूलांक ८ ची गोष्ट ही सहज मिळालेल्या यशाची गोष्ट नाही.
ही गोष्ट आहे —थांबण्याची वेळ आली तरी न थांबण्याची. पडल्यावर पुन्हा उभं राहण्याची.
उशीर झाला तरी विश्वास न सोडण्याची.
कधी लोक म्हणतात —“याला इतका वेळ का लागला?” पण त्यांना हे माहीत नसतं...काही झाडं लवकर उगवतात...पण काही झाडांची मुळे खूप खोलवर जातात. मूलांक ८ ची कहाणी अनेकदा अशीच असते. उशीर होतो...पण पाया मजबूत असतो.प्रवास कठीण असतो...पण मिळालेलं यश खोलवर रुजलेलं असतं. फक्त मूलांक ८ पाहून संपूर्ण व्यक्तिमत्त्व ठरवता येत नाही. जन्मतारखेत ८ किती वेळा आहे, इतर कोणते अंक आहेत आणि भाग्यांक काय आहे — यानुसार अंकशास्त्रीय interpretation बदलू शकते. अंकशास्त्रातील ही मांडणी मान्यता आणि व्यक्तिमत्त्वाच्या अभ्यासाच्या दृष्टिकोनातून घ्यावी.
अंक फक्त संख्या नाहीत...
प्रत्येक अंकामागे एक स्वभाव, एक संघर्ष आणि एक कहाणी असते. तुमचा मूलांक ८ आहे का?
तुमच्या आयुष्यातही यशाला उशीर झाला आहे का?
कमेंट करून सांगा.




सीमा बक्षी
9834571153


# आधार सक्तीचा नवा फास....!




शासकीय यंत्रणा चालवणारा सर्वात महत्त्वाचा कणा म्हणजे 'कर्मचारी वर्ग', पण सध्या याच कर्मचाऱ्यांमध्ये प्रशासनाच्या एका नव्या निर्णयामुळे प्रचंड असंतोष आणि चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे. राज्य शासनाने कर्मचाऱ्यांसाठी आधार कार्ड अपडेट करणे आणि ते 'शालार्थ' तसेच इतर शासकीय प्रणालींशी जुळवणे अनिवार्य केले आहे. धक्कादायक बाब म्हणजे, जर नाव, जन्मतारीख किंवा इतर माहितीमध्ये अल्पसा फरक आढळला, तर थेट 'पगार रोखण्याचा' इशारा देण्यात आला आहे. प्रशासनाचा हा मनमानी आणि जुलमी कारभार कर्मचाऱ्यांवर सरळसरळ अन्याय करणारा ठरत आहे.

एकिकडे, सर्वोच्च न्यायालयाचे विविध दाखले आणि स्वतः शासनाच्या विविध जाहिरातींमधून "आधार ही केवळ ओळखीची पुष्टी आहे, ती सर्वत्र सक्तीची नाही" असा मोठा गाजावाजा केला जातो. कोणत्याही महत्त्वाच्या कामासाठी केवळ आधार कार्ड पुरेसे मानले जात नाही; त्यासोबत अधिवास प्रमाणपत्र, शाळा सोडल्याचा दाखला, पॅन कार्ड यांसारखे इतर वैध कागदपत्रे जोडणे बंधनकारक असते. मग प्रश्न असा उपस्थित होतो की, ज्या कर्मचाऱ्यांची मूळ सेवापुस्तिका (Service Book), शैक्षणिक प्रमाणपत्रे आणि इतर सर्व वैध कागदपत्रे तपासूनच त्यांना सेवेत सामावून घेण्यात आले आहे, त्यांच्या पगारासाठीच आता आधारचीच सक्ती का?

आतापर्यंत ज्या कर्मचाऱ्यांचे पगार याच कागदपत्रांच्या आधारे नियमितपणे वितरित होत होते, त्यांना एका रात्रीत आधार अपूर्णतेचे कारण देऊन वेतनापासून वंचित ठेवणे कितपत योग्य आहे? आधार कार्डावरील नावात स्पेलिंगची चूक असणे किंवा मराठी-इंग्रजी भाषांतरामुळे फरक पडणे, ही अत्यंत सामान्य तांत्रिक बाब आहे. यात कर्मचाऱ्यांचा काय दोष? या तांत्रिक त्रुटी दुरुस्त करण्यासाठी आधार केंद्रांचे उंबरे झिजवणे, अपॉइंटमेंट न मिळणे आणि तासनतास रांगेत उभे राहणे यामुळे कर्मचाऱ्यांचा अमूल्य वेळ आणि मानसिक शांतता दोन्ही पणाला लागत आहे.




शासकीय कामकाजात आणि राजकीय प्रक्रियेत जशी इतर विविध दस्तऐवजांची पडताळणी करून प्रक्रिया पूर्ण केली जाते, तशीच मुभा कर्मचाऱ्यांच्या बाबतीत का दिली जात नाही? केवळ आधार जुळत नाही म्हणून थेट पगार थांबवणे म्हणजे कर्मचाऱ्यांच्या उपजीविकेवर गदा आणण्यासारखे आहे. कुटुंबाचा उदरनिर्वाह, मुलांचे शिक्षण,कर्जाचे हप्ते आणि आजारपणाचा खर्च ज्या वेतनावर अवलंबून असतो, ते वेतन रोखणे हा संतापजनक प्रकार आहे.

शासनाने आपल्या या तुघलकी धोरणाचा पुनर्वचार करणे अत्यंत गरजेचे आहे. आधार अपडेट करण्यासाठी कर्मचाऱ्यांना पुरेसा वेळ देण्यात यावा किंवा इतर अधिकृत सरकारी कागदपत्रांच्या आधारे पडताळणी पर्याय उपलब्ध करून द्यावा. प्रशासनाने आपल्या कर्मचाऱ्यांचा सन्मान राखत, वेतनावरील ही 'आधार टांगती तलवार' तत्काळ हटवावी; अन्यथा कर्मचाऱ्यांमधील हा असंतोष येणाऱ्या काळात मोठ्या संघर्षाचे रूप धारण करेल, यात शंका नाही.


प्रा. प्रज्ञानंद थोरात
मो.9822674487


# मराठी रंगभूमीवरील एक अग्रणी नाटककार, कादंबरीकार



भार्गवरम विठ्ठल वरेरकर जे मामा वरेरकर म्हणून सर्वत्र ओळखले जातात. मामा वरेरकर यांचा जन्म २७ एप्रिल १८८३ रोजी झाला. ते एक भारतीय मराठी भाषेतील नाटककार, कादंबरीकार आणि राजकारणी होते. त्यांनी राज्यसभेचे सदस्य म्हणून काम केले आणि त्यांना पद्मभूषण, पद्मविभूषण आणि संगीत नाटक अकादमी फेलोशिप यासह नागरी आणि सांस्कृतिक सन्मानांनी गौरविण्यात आले. भार्गवरम विठ्ठल वरेरकर यांचा जन्म २७ एप्रिल १८८३ रोजी चिपळूण येथे झाला . त्यांनी आपले प्राथमिक आणि माध्यमिक शिक्षण मालवण येथे पूर्ण केले. १८९८ मध्ये, त्यांच्या वडिलांनी त्यांना शाळेतून काढून 'वैद्यकीय विद्यार्थी' म्हणून वैद्यकशास्त्राचा अभ्यास करण्यासाठी रत्नागिरी येथील सिव्हिल हॉस्पिटलमध्ये पाठवले.

## मामा वरेरकर आज स्मृतिदिन..

तथापि, त्यांच्या शारीरिक दुर्बलतेमुळे त्यांना वैद्यकीय शिक्षण सोडून द्यावे लागले. सिव्हिल हॉस्पिटलमध्ये असताना, वरेरकरांनी मराठी कवी कान्होबा रणछोडदास कीर्तीकर यांच्याकडे शिक्षण घेतले. कीर्तीकरांच्या मार्गदर्शनामुळे आणि त्यांच्या दुर्मिळ ग्रंथसंग्रहाच्या उपलब्धतेमुळे, वरेरकरांनी विल्यम शेक्सपियर, हेन्रिक इब्सन आणि मोलियर यांची नाटके वाचली. वैद्यकीय शिक्षण सोडल्यानंतर, वरेरकर टपाल विभागात नोकरीला लागले, जिथे त्यांनी पूर्णवेळ लेखनाला सुरुवात करण्यापूर्वी २० वर्षे काम केले. त्यांच्या साहित्यकृतींमध्ये नाटके, कादंबऱ्या, लघुकथा आणि रहस्यकथा यांचा समावेश होता. वरेरकरांनी 'कुंजविहरी' (१९१४) पासून नाटके लिहायला सुरुवात केली . त्यांच्या लेखनाचा भर समाजातील सामान्य लोकांचे जीवन आणि परिस्थिती याबद्दल जागरूकता पसरवण्यावर होता. पूर्ण लांबीच्या नाटकांसोबतच त्यांनी अनेक एकांकिकाही लिहिल्या. त्यांनी रवींद्रनाथ टागोर, जेम्स बॅरी, हेन्रिक इब्सन आणि विल्यम बॅरेट यांच्या नाटकांचे मराठीत भाषांतरही केले. वरेरकर यांनी मराठीत अनेक कादंबऱ्या लिहिल्या. विशेष म्हणजे, त्यांनी शरतचंद्र चट्टोपाध्याय , बंकिमचंद्र चट्टोपाध्याय आणि प्रभात कुमार मुखोपाध्याय यांच्या कामांसह बंगाली साहित्याचे मराठीत भाषांतर केले . त्यांनी शरतचंद्र चट्टोपाध्याय आणि रवींद्रनाथ टागोर यांच्या कथांचेही मराठीत भाषांतर केले. नाटके आणि कादंबऱ्यांव्यतिरिक्त, वरेरकरांनी त्यांच्या नाट्यकृतींसाठी लिहिलेल्या गीतांसोबतच 'विजयादशमी' आणि 'उमाजी नायकाचा पोवाडा' यांसारख्या कवितांची रचना केली. त्यांनी 'माझा नाटकी संसार' नावाचे चार खंडांचे आत्मचरित्र लिहिले , जे १९४१, १९५२, १९५९ आणि १९६२ या वर्षांमध्ये प्रकाशित झाले. त्यांनी मोठ्या प्रमाणात रहस्यकथा आणि लघु गद्य लेख देखील लिहिले. वरेरकर यांनी १९३८ मध्ये मराठी नाट्य संमेलनाचे अध्यक्ष म्हणून काम पाहिले. १९४४ मध्ये धुळे येथे झालेल्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्षपद भूषविले . नंतर त्यांची राज्यसभेचे सदस्य म्हणून नियुक्ती करण्यात आली. वरेरकर यांचे २३ सप्टेंबर १९६४ रोजी दिल्लीत निधन झाले. भार्गवराम विठ्ठल वरेरकर हे मराठी नाटककार, कादंबरीकार, लेखक होते. त्यांचे शालेय शिक्षण मालवण व रत्नागिरी येथे झाले. शिक्षणानंतर ते टपाल खात्यात नोकरीस लागले. इ.स. १९०८ साली त्यांनी ‘कुंजविहारी’ हे पहिले नाटक लिहिले. पांतु त्यांचे गाजलेले पहिले नाटक म्हणजे रंगभूमीवर ७ सप्टेंबर, १९१८ रोजी प्रथम आलेले ‘हाच मुलाचा बाप’ हे नाटक होय. नाट्यलेखनात वरेरकर रमत गेल्यावर त्यांनी टपाल खात्यातील नोकरी सोडून दिली व लेखनावरच लक्ष एकवटले. नाटककार, साहित्यिक म्हणून ओळख असणारे वरेरकर राजकारणातदेखील सक्रिय होते. ते काँग्रेस पक्षाचे कार्यकर्ते होते. पुढे राज्यसभेवर त्यांची नियुक्तीही झाली होती.

# आंदोलन म्हणजे कही पे निगाहे, कही पे निशाना



स्वातंत्र्य प्राप्तीसाठी आपल्या देशात सत्याग्रह झाले. सत्याग्रहाची संकल्पना महात्मा गांधी यांनी रुजवली. अहिंसक मार्गाने सत्याचा आग्रह धरून अन्याय, अत्याचाराचा प्रतिकार केला जात असे. सत्याग्रहात हिंसेला थारा नव्हता. ज्यांच्या विरोधात सत्याग्रह केला जायचा, त्यांना शब्दांनी देखील दुखवण्यात येत नसे. सत्याग्रहाची दिशा आणि उद्देश स्पष्ट असायचा. आता सत्याग्रहाची जागा आंदोलनानं घेतली आहे. दोन्हीत अत्यंत सुक्ष्म फरक आहे. आंदोलन देखील अन्याय, अत्याचाराच्या विरोधात आणि मागण्या मान्य करून घेण्यासाठी केलं जातं. आंदोलन अहिंसक मार्गानंच केलं जावं हि सर्वसामान्यांची अपेक्षा असते. परंतू आता आपल्या देशात आंदोलन करण्याच्या पद्धतीत भयंकर फरक पडला आहे. देशात संविधानानं नागरिकांना प्रदान केलेले हक्क आणि अधिकारांची पायमल्ली होत आहे. हुकुमशाही शासनात नागरिकांची गळचेपी सुरू असून, आवाज दाबला जात असल्याचा कांगावा सुरू आहे. संसदेत आणि सार्वजनिक ठिकाणी घटनेची प्रत दाखवून, भारतीय घटना धोक्यात असल्याचे काही नेते सांगतात.

आता आंदोलन म्हणजे कही पे निगाहे, कही पे निशाना असं आहे. सुधारित नागरिकत्व कायदा, प्रस्तावित नागरिकत्व नोंदणी आणि राष्ट्रीय लोकसंख्या नोंदणी च्या विरोधात १०० हून अधिक दिवस मुख्य रस्ते आणि सार्वजनिक जागा अडवून दिल्लीतील शाहिनबाग येथे आंदोलन करण्यात आले. भ्रष्टाचार से आझादी, हमे चाहिए आझादी, मनुवाद से आझादी, अश्या घोषणा आंदोलनातील महिला आणि मुलांनी दिल्या. यांचा आंदोलनाच्या विषयाशी काय संबंध? या आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर उत्तर - पूर्व दिल्लीतील जाफराबाद आणि सीलमपुर येथे उफाळलेल्या हिंसाचारात ५३ जणांचा दुर्दैवी मृत्यू झाला. कोट्यवधी रुपयांच्या मालमत्तेचे नुकसान झाले. या हिंसाचाराचे सूत्रधार निरपराध असल्याचे ढोल काही राजकारणी बडवतात. त्यातील एका वर माहितीपट देखील काढण्यात आला आहे. २०२० -२१ मध्ये कृषी कायद्याच्या विरोधात तब्बल ३७८ दिवस तथाकथित शेतकरी आंदोलन चालले. यावेळी दिल्लीच्या सिंधू, टिकरी आणि गाझीपूर च्या सीमा अडवल्या होत्या. २६ जानेवारी २०२१ रोजी ट्रॅक्टर रॅली चे निमित्त करून हिंसाचार घडवण्यात आला. लाल किल्ल्यावर धार्मिक झेंडा फडकवण्याचा प्रकार घडला. नेत्यांनी आपत्तिजनक विधानं केली. नीट परीक्षेचा पेपर फुटला. काही विद्यार्थ्यांनी आत्महत्या केली. त्याचा निषेध म्हणून. तसेच आत्महत्याग्रस्त विद्यार्थ्यांच्या पालकांना आर्थिक मदत मिळावी. आणि मुख्यतः केंद्रीय शिक्षण मंत्र्यांनी राजीनामा द्यावा यासाठी दिल्ली च्या जंतरमंतर येथे आंदोलन झाले. आंदोलनात सहभागी झालेल्यांनी देशाचे पंतप्रधान, गृहमंत्री यांना पोटभर शिव्या दिल्या. त्यांना जीवे मारण्याची धमकी दिली. अश्लिल, अशोभनीय कृत्य केले. असंसदीय भाषा वापरली. देशाच्या लष्करा बद्दल आक्षेपार्ह विधान केले. देशाचं संसद भवन उखडून फेकण्याची धमकी दिली. पोलिसांवर हल्ला केला. शासकीय तसेच खासगी मालमत्तेचे नुकसान केले. अश्यांची पाठराखण देशातील तथाकथित नामांकित आणि विद्वान व्यक्ती करतात. महाराष्ट्रातील आरक्षण आंदोलनाची तीच कथा आहे. आली लहर कि, केला कहर अशी स्थिती आहे. याला, त्याला शिव्या. एकेरी भाषेचा वापर. याला गाडू, त्याला फाडू, अमक्याला पाडू. असे फटाके फोडणं सुरू असतं. आंदोलन करण्याची परिस्थिती कोणामुळे निर्माण झाली आहे, याची आंदोलकाला पूर्ण कल्पना आहे. पण सांगता कोणाला. कारण आपलेच दात आणि आपलेच ओठ. मग काढा वड्याचं तेल वांग्यावर. यापेक्षा अधिक, कुठल्या प्रकारचे स्वातंत्र्य मिळावे हि अपेक्षा आहे कळत नाही. आता आंदोलनाचा विषय आणि उद्देश वेगळा असतो. त्याच्या आडून जाती, पंथ, धर्मात फुट पाडून, अशांतता निर्माण करणे, न्यायव्यवस्था, निवडणूक आयोग विकल्या गेले असल्याचा भ्रम पसरवणे, हिंसाचार घडवून, देशाचे तुकडे पाडणे. हा एककलमी कार्यक्रम आहे. अश्या कुटील आणि कारस्थानी अवलादी बघून, राष्ट्रपित्यांच्या आत्म्याला स्वर्गात नक्कीच क्लेश होत असतील.


हेमंत जकाते
अकोला

# पावसाने मारली दांडी...
# गुरांना कशी खाऊ घालावी कडब्याची पेंडी

प्रतिनिधी २३ सप्टेंबर

**अकोला :** मागील दोन महिन्यांपासून जिल्ह्यात पावसाने दडी मारली आहे. पाऊस गायब झाल्याने शेतकऱ्यांनी पेरलेले सोयाबीन पीक करपून गेले आहे. त्यामुळे यंदाच्या तीव्र

दुष्काळजन्य परिस्थितीमुळे सोयाबीन व कापूस या पिकांसोबतच जनावरांच्या चाऱ्याचा

प्रश्न अत्यंत गंभीर बनला आहे. पुढील वर्षभरासाठी गोठ्यातील जनावरांच्या चाऱ्याची सोय कशी करायची, या चिंतेत पशुपालक आणि शेतकरी अडकले आहेत. या टंचाईमुळे सध्या ज्वारीच्या कडब्याला सोन्याचे मोल आले असून, त्याचे दर मार्च-एप्रिलमधील सुगीच्या तुलनेत दुपटीने वाढले आहेत. त्यामुळे वाया गेलेल्या सोयाबीनचे भुस्कटावर जनावरांचे पोट भरण्याच्या तयारीत शेतकरी आहेत.

### परतीच्या पावसावर चाऱ्याचे गणित अवलंबून

परतीच्या पावसाने जोरदार हजेरी लावल्यास येत्या रब्बी हंगामात ज्वारी, तसेच इतर चारा पिके घेण्याचा मार्ग मोकळा होईल. समाधानकारक पाऊस न झाल्यास रब्बी हंगाम संकटात येऊन चाऱ्याची तसेच कडब्याची नवीन आवक होण्यात अडचणी येतील. त्यामुळे उन्हाळ्यात चाऱ्याची भीषण टंचाई जाणवेल. त्यामुळे चाऱ्याचे गणित आता परतीचा पाऊस कसा होतो, यावर अवलंबून आहे.




### बाजारात अत्यल्प आवक

मार्च-एप्रिलच्या सुगीच्या काळात जो कडबा २ हजार ते २५०० रुपये प्रतिशेकडा विकला जात होता, तोच दर आता दुष्काळामुळे थेट ४ हजार ५०० रुपयांवर पोहोचला आहे. बाजारात क्विंटलचे दर १,७०० ते २,००० रुपये झाले आहेत. दोन ते अडीच किलो वजनाची एक पेंडी ५० रुपयांना पडत असून, एवढी मोठी किंमत मोजूनही कडबा मिळणे कठीण झाले आहे. मागील रब्बीत ज्वारीचे घटलेले क्षेत्र आणि भविष्यातील चाऱ्याची चिंता यामुळे पशुपालक स्वतःकडील कडबा विकायला तयार नाहीत, ज्यामुळे बाजारातील आवक प्रचंड घटली आहे.

## फेरीवाल्यांचे नियोजन कधी?

प्रतिनिधी २३ सप्टेंबर

**अकोट :** अकोट शहरात दिवसेंदिवस फेरीवाले आणि रस्त्यालगत विक्री करणाऱ्यांची संख्या वाढत असून, त्याचा थेट परिणाम शहरातील वाहतुकीवर होत आहे. विशेषतः छत्रपती शिवाजी महाराज चौक ते सोनू चौक मार्गावर रस्त्यालगत फळविक्रेते व इतर विक्रेते उभे राहत असल्याने वाहनांची वर्दळ आणि नागरिकांची गर्दी वाढून वाहतूक कोंडीची समस्या निर्माण होत आहे. शहरातील वाढती लोकसंख्या, वाहनांची वाढती संख्या आणि रस्त्यांची मर्यादित जागा लक्षात घेता फेरीवाले व रस्त्यावरील विक्रेत्यांसाठी योग्य जागा निश्चित करून त्यांचे नियोजन करणे आवश्यक आहे. केवळ कारवाई करण्यापेक्षा विक्रेत्यांच्या उपजीविकेचा विचार करून त्यांना नियोजित जागा उपलब्ध करून दिल्यास वाहतूक कोंडी आणि अतिक्रमणाचा प्रश्न दोन्ही मार्गी लागू शकतात.

# रिद्धि सिद्धि गणेश मंडळात भजन, सामाजिक उपक्रमांची रेलचेल
## जिल्हाधिकारी आणि पोलीस अधीक्षकांनी मंडळाच्या उपक्रमांचे केले कौतुक

प्रतिनिधी २३ सप्टेंबर

**अकोला:** रामनगर येथील श्री रिद्धि सिद्धि गणेश उत्सव मंडळात आयोजित विविध भक्तिमय कार्यक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. विशेष म्हणजे, जिल्हाधिकारी व पोलीस अधीक्षकांनी भेट देत या मंडळाच्या विविध सामाजिक उपक्रमांची प्रशंसा केली आहे.




अकोला येथील रामनगर मधील श्री रिद्धि सिद्धि गणेश उत्सव मंडळात आयोजित विविध कार्यक्रम अतिशय उत्साहात आणि भक्तीमय वातावरणात पार पडला. या मनमोहक संध्याकाळमध्ये भाविकांनी भजनोंच्या मधुर धुनांवर ठेका धरत भक्तिरसाचा भरपूर आनंद घेतला. विशेष म्हणजे, जिल्ह्याच्या जिल्हाधिकारी वर्षा मीना आणि पोलीस अधीक्षक अर्चित चांडक यांनी या कार्यक्रमाला भेट देऊन गणेशोत्सवातील विविध उपक्रमांचे भरभरून कौतुक केले. त्यांच्या या गरिमामयी उपस्थितीमुळे आयोजनाची शोभा आणखी वाढली. यंदाच्या वर्षी शहरात पाणीटंचाईचे सावट असल्याने, सर्व सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांनी गणेश विसर्जन करताना काटकसरीचा आणि पर्यावरणपूरक मार्ग पत्करावा, अशी विनंती प्रशासनाकडून करण्यात आली आहे. अकोल्यातील विविध मंडळांद्वारे केल्या जाणाऱ्या पूजा-अर्चा, आकर्षक देखावे आणि समाजोपयोगी उपक्रमांची प्रशासनाने दखल घेत गौरवोद्गार काढले. मंडळाच्यावतीने उपस्थित सर्व अतिथी व भाविकांचे आभार मानण्यात आले असून, बाप्पाच्या जयघोषाने संपूर्ण परिसर दुमदुमून गेला होता.



आमदार साजीद खान पठाण यांनी गणेश विसर्जन घाटाची पाहणी केली. तसेच संबंधित अधिका-यांना आवश्यक सूचना दिल्या

## वीज मिटर बदलाच्या नावाखाली नागरिकांची भरभक्कम फसवणूक!

अकोला : अकोल्यात वीज मिटर बदलाच्या नावाखाली ग्राहकांची मोठी फसवणूक होत असल्याचा गंभीर प्रकार समोर आला आहे. जादा वीज बिल आणि मनमानी कारभारामुळे त्रस्त झालेल्या नागरिकांनी आता थेट प्रशासनाकडे दाद मागितली आहे. अकोल्यात वीज वितरण कंपनीच्या भोंगळ कारभाराचा फटका सर्वसामान्य नागरिकांना बसत असून, वीज मिटर बदलाच्या नावाखाली मोठी फसवणूक होत असल्याचे समोर आले आहे. एका नागरिकाला तब्बल सहा हजार रुपयांचे जादा वीज बिल आले, आणि जुने मिटर बदलून विजया प्रमोद गावंडे यांच्या नावाचे नवीन मिटर बसवण्यात आले.

# रहदारीच्या रस्त्यावर बांधकाम साहित्यामुळे अपघाताचा धोका

प्रतिनिधी २३ सप्टेंबर

**अकोला:** शासकीय दूध डेअरी समोरचा अर्थात नेहरु पार्क कडे जाणारा रस्ता अतिशय वर्दळीचा आहे. यारस्त्यावर वाहतुकीस अडथळा ठरणारा सिमेंट कॉंक्रिट पंप ट्रक जप्त करण्याची गरज आहे. महापालिका, शहर वाहतुक शाखेने अपघातास कारणीभूत ठरणाऱ्या गोष्टींवर कडक कारवाईची मागणी नागरिकांनी केली आहे.

रस्त्यावर रेती पडली की वाहने घसरतात. रस्त्यावर गिट्टी पडली की वाहनांचा अपघात होतो. पण, शासकीय दूध डेअरी समोर थेट




सिमेंट कॉंक्रीट पंप ची यंत्र सामग्री व सिमेंट कॉंक्रीट वाहणाऱ्या ट्रकने आज अर्धा रस्ता ब्लॉक केला होता. भरधाव येणाऱ्या वाहनांचा येथे अपघात होण्याची शक्यता वाढली होती. लाईन पंप लावून थेट बांधकामाच्या स्लॅबवर कॉंक्रीटचे मिश्रण पोहचविण्यासाठी ही यंत्रणा लावली जाते. पण, ही लावताना वर्दळीचा रस्ता पाहता योग्य ती दक्षता येथे घेतल्या गेली नाही. असे अपघातास कारणीभूत ठरणारी यंत्रणा जप्त करत त्याच्यावर कारवाईची गरज आहे.

# शारिक जावेद डोकडिया यांनी पत्रकार परिषदेतील ते आरोप फेटाळले
## ज्या व्यक्तीसोबत कोणताही व्यवहारच झाला नाही, तिथे फसवणूक कशी ?

प्रतिनिधी २३ सप्टेंबर

अकोला : अकोल्यात ऑटोक्रेट कोचिंग क्लासचे संचालक शारिक जावेद डोकाडिया यांनी आपल्यावर लागलेले फसवणुकीचे आरोप फेटाळून लावले आहेत. त्यांनी या प्रकरणाची लिखित तक्रार रामदास पेठ पोलीस ठाण्यात केली आहे. अकोला येथील ऑटोक्रेट कोचिंग क्लासचे संचालक शारिक जावेद दोकडिया यांनी १९ सप्टेंबर रोजी शासकीय विश्रामगृह, अकोला येथे आयोजित पत्रकार परिषदेत त्यांच्यावर लावण्यात आलेल्या आरोपांवर आपली बाजू मांडली आहे. त्यांनी आरोप केला की, पत्रकार परिषदेत त्यांच्या तथा त्यांचे वडील जावेद जकरिया डोकाडिया यांच्या संदर्भात एकतर्फी व भ्रामक माहिती सादर




करून त्यांची सामाजिक आणि व्यावसायिक प्रतिष्ठा मलीन करण्याचा प्रयत्न करण्यात आला. या संदर्भात त्यांनी २१ सप्टेंबर रोजी रामदास पेठ पोलीस ठाण्यात लिखित तक्रार देऊन तपास व कारवाईची मागणी केली आहे. शारिक जावेद दोकडिया यांचे मुख्य म्हणणे आहे की, ज्या व्यक्तीसोबत त्यांचा कोणताही करारनामा किंवा समझोता झालाच नाही, त्या व्यक्तीकडून त्यांच्याविरुद्ध फसवणूक किंवा मालमत्तेशी संबंधित आरोप लावणे चुकीचे आहे. त्यांचे म्हणणे आहे की, संबंधित परिसराबाबत त्यांचा करार श्रीमती हमीदा साबीर हुसैन खामोसी यांच्यासोबत झाला होता आणि याच आधारावर ते आपल्या कागदपत्रांनुसार कोचिंग क्लास चालवत आहेत. त्यांच्या मते, २५ मे २०२२ रोजी श्रीमती हमीदा साबीर हुसैन खामोसी यांनी त्यांना लिखित परवानगी/करारनामा दिला होता. यानंतर अकोला महानगरपालिकेकडून कोचिंग



क्लास चालवण्याशी संबंधित परवाना, उद्यम नोंदणी आणि ट्रेडमार्कशी संबंधित कागदपत्रेही प्राप्त करण्यात आली आहेत.

शारिक दोकडिया यांनी सांगितले की, जर त्यांच्यावर लावण्यात आलेल्या आरोपांची चौकशी केली गेली, तर संबंधित करारनामा, महानगरपालिकेचा परवाना, उद्यम नोंदणी आणि इतर उपलब्ध कागदपत्रे तपासासाठी सादर केली जाऊ शकतात. त्यांचे म्हणणे आहे की, त्यांनी कोणत्याही मालमत्तेवर बेकायदेशीर ताबा मिळवलेला नाही आणि कोणतीही खोटे कागदपत्रे तयार केलेली नाहीत. शारिक दोकडिया यांच्या मते, संबंधित मालमत्तेबाबतचा विवाद आधीपासूनच न्यायालयात प्रलंबित आहे. प्रकरण न्यायप्रविष्ट असतानासुद्धा पत्रकार परिषदेच्या माध्यमातून आरोप सार्वजनिक केल्यामुळे विद्यार्थी, पालक आणि सामान्य लोकांमध्ये संभ्रमाचे वातावरण निर्माण होत आहे. त्यांनी सांगितले की, मालमत्ता आणि कराराशी संबंधित वादाचा अंतिम निर्णय न्यायालयामार्फतच घेतला जाणे अपेक्षित आहे. त्यामुळे न्यायालयाचा निकाल लागण्यापूर्वी कोणत्याही पक्षाला दोषी ठरवणारी भाषा सार्वजनिक रूपाने वापरून बदनामी करणे योग्य नाही. या प्रकरणात रामदास पेठ पोलीस ठाण्यात लिखित अहवाल सादर करण्यात आला आहे.

# आधी वंदू तुज मोरया...



हरजीमल ओंकारमल पेट्रोल पंप जवळील बाप्पा



प्रियंका चौधरी, अकोट फाईल यांच्याकडील गणेश



सिंधी कॅम्प विराजमान श्री गणेश



श्री रिद्धी सिद्धी गणेश उत्सव मंडळ न्यू राधाकिसन प्लॉट



सिंधी कॅम्पचा चिंतामणी



हिंगणा रोडचा राजा



श्री जुना कपडा बाजार नवयुवक उत्सव मंडळ (युवा सिद्धी)



श्री बालाजी गणेशोत्सव मंडळ जुनी चावडी बाळापूर



श्री विश्वशांती गणेश उत्सव मंडळ, तेल्हारा



जय हो गणेशोत्सव मंडळ गाडेगांव रोड तेल्हारा



प्रताप गणेशोत्सव मंडळ,तेल्हारा



रामराज्य प्रतिष्ठान गणेशोत्सव मंडळ गाडेगांव(तेल्हारा)

# मध्यरात्री रेती वाहतुकीवर महसूल विभागाची धडक

## खापरखेड्याजवळ दोन टिप्पर व ट्रॅक्टर ताब्यात; SDO सिद्धार्थ शुक्ला यांच्या नेतृत्वाखाली कारवाई

प्रतिनिधी २३ सप्टेंबर

**धारणी:** धारणी तालुक्यात सुरू असलेल्या अवैध रेती वाहतुकीविरोधात महसूल प्रशासनाने मध्यरात्री कारवाई केली. उपविभागीय अधिकारी (SDO) सिद्धार्थ शुक्ला यांच्या नेतृत्वाखाली रात्री सुमारे २ वाजता खापरखेडा परिसरात करण्यात आलेल्या कारवाईत दोन टिप्पर आणि एक ट्रॅक्टर ताब्यात घेण्यात आले.



धारणी तालुक्यात अवैधरीत्या रेती वाहतूक होत असल्याची माहिती प्रशासनाला मिळाली होती. त्यानंतर SDO सिद्धार्थ शुक्ला यांनी महसूल पथकासह खापरखेडा परिसरात पाहणी केली. यावेळी संशयास्पदरीत्या रेती वाहतूक करणारी वाहने आढळून आल्यानंतर ती अडवून ताब्यात घेण्यात आली.

### रात्रीच्या वाहतुकीवर प्रशासनाची नजर

रेतीची अवैध वाहतूक रोखण्यासाठी महसूल विभागाकडून रात्रीच्या वेळीही तपासणी आणि कारवाई केली जात असल्याचे या घटनेतून स्पष्ट झाले आहे. खापरखेडा परिसरातील मध्यरात्रीच्या कारवाईमुळे अवैध रेती वाहतूक करणाऱ्यांमध्ये खळबळ उडाली आहे.

या कारवाईत एमएच २७ बीएक्स ९४४८, एमएच ४९ एपी १८३३ क्रमांकाचे दोन टिप्पर तसेच एमएच २७ बीझेड १०८३ क्रमांकाचा ट्रॅक्टर ताब्यात घेण्यात आला. तिन्ही वाहनांचा पंचनामा करण्यात आला असून, पुढील प्रशासकीय कारवाई सुरू आहे.

कारवाईदरम्यान मंडळ अधिकारी मनीष रोकडे, तलाठी रवी भिलावेकर, तलाठी जितेंद्र कास्डेकर, तलाठी प्रवीण मावसकर तसेच पोलीस कर्मचारी उपस्थित होते.

# पर्यावरण पूरक गणपती विसर्जनातून मिळणार संशोधित शेणखत

## गाडगेबाबा गोरक्षण संस्था माहुली ( धांडे) यांचा उपक्रम

प्रतिनिधी २३ सप्टेंबर

**दर्यापूर:** पर्यावरण व समाज सेवा उपक्रमांसाठी प्रसिद्ध असलेल्या दर्यापूर तालुक्यातील माहुली ( धांडे) येथील गाडगेबाबा गोरक्षण संस्थेच्या वतीने जे लोक आपल्या घरी स्थापित गणपतीरायाचे विसर्जन गोरक्षण स्थळावरील शेततळ्यामध्ये करतील त्या सर्व व्यक्ती अथवा गणेशमंडळांना या गोरक्षण स्थळावर संशोधनाद्वारे निर्मित गाईच्या शेणखताची पाच किलो वजनाची बॅग दिल्या जाणार आहे . गोरक्षण संस्थेच्या वतीने ही योजना पर्यावरण पूरक कार्याचा गौरव म्हणून करीत असल्याची माहिती संस्थेचे सचिव शेखर पाटील यांनी आमच्या वृत्रपत्राच्या स्थानिक प्रतिनिधीला दिली आहे . गणपती स्थापनेच्या कालावधीत सुद्धा ज्या ज्या व्यक्तिंनी दर्यापूर येथील कस्तूरी नर्सरी मधून मातीचा गणपती विकत घेतला त्या सर्वांना गौरवपर याच खताची दोन किलो वजनाची बॅग गोरक्षण संस्थेद्वारे देण्यात आलेली आहे. लोकांच्या मनात धार्मिक विधी पार पाडतांना पर्यावरण संतुलन राखण्याचे भान अबाधित राहण्यासाठी व या कार्यास्तव समाजाला प्रोत्साहीत करण्यासाठी वर्षभर अश्या प्रकारच्या योजना राबविण्यात येणार असल्याचे संस्थेचे संस्थापक - विश्वस्त प्रा गजानन भारसाकळे यांनी प्रतिपादीत केले आहे . मागील वर्षी नगर परिषद दर्यापूर द्वारे संपूर्ण दर्यापूर शहरातून गोळा करण्यात आलेल्या शेकडो श्री.



गणेश मूर्ती याच गोरक्षण परीसरातील शे त त व्य ा म ध्ये विसर्जित करण्यात आलेल्या होत्या ही बाब इथे आठवणीतील ठरते . कस्तूरी नर्सरी येथून मातीचा गणपती विकत नेणाऱ्या प्रा . एस के देशमुख, शिल्पा होले, डॉ बोंडे, डॉ दिपक उफाळे, अश्विन होले, सुनिल भाऊ डिके, गणेशराव लाजूरकर, सचिन कोरडे, बबलू भाऊ शहा, पटेल परिवार, परिक्षीत चिकटे, अँड आनंद महाजन इत्यादी परिवारांनी गणेश स्थापना व विसर्जन या दोन्ही दिवसाला गाडगेबाबा गोरक्षण संस्थेने जाहीर केलेल्या पर्यावरण कार्याच्या या अभिनव उपक्रमा बद्दल मनस्वी आभार व्यक्त करून अभिनंदन केले आहे .

# प्रथम वर्ष बी. आर्किटेक्चर व डिप्लोमा आर्किटेक्चर विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक परिचय कार्यक्रम संपन्न

प्रतिनिधी २३ सप्टेंबर

**अमरावती :** पी. आर. पोटे पाटील कॉलेज ऑफ आर्किटेक्चर, अमरावती येथे प्रथम वर्ष बी. आर्किटेक्चर व डिप्लोमा आर्किटेक्चरच्या विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक परिचय (ओरिएंटेशन) कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाचे सुरुवात सर्व प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्यांच्या प्रवेश दिंडी व दिपप्रज्वलनाने झाली.

यानंतर आपल्या प्रास्ताविकामध्ये प्राचार्य संजय देशमुख यांनी कॉलेज सुरू झाल्यापासून दर वर्षी ओरिएंटेशन परिचय कार्यक्रम आयोजित करण्यात येतो व यामध्ये प्रामुख्याने येथील शैक्षणिक परिसंस्थेची ओळख करून देण्यात येते असे सांगितले. तसेच येथे सिलॅबस



च्या पलीकडील विविध सामाजिक व वास्तुशास्त्र संबंधित उपक्रमांचे आयोजन केले जाते . यातून विद्यार्थ्या ची शैक्षणिक जडणघडण व व्यक्तिमत्व विकास उंचावतो. या महाविद्यालयाने अनेक ग्रामीण व मागासलेल्या भागातील विद्यार्थ्यांचे परिवर्तन एका आत्मविश्वास पूर्ण व सामाजिक बांधिलकी असलेल्या आर्किटेक्ट मध्ये केलेले आहे. येथील अनेक विद्यार्थी आज विविध उच्च पदांवर कार्यरत असल्याचे नमूद केले व देश विदेशात महाविद्यालयाचे नाव मोठे करीत असल्याचे सांगितले. यानंतर सर्व नवीन विद्यार्थ्यांचे मंचावर भेटवस्तू देऊन स्वागत करण्यात आले व त्यांचा परिचय देण्यात आला. यानंतर महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी आपले अनुभव विशद केले यामध्ये सर्वस्वी कु सानिका जाधव कु ज्ञानेश्वरी कडू, सार्थक पवार, सार्थक निमकर, प्रिन्स रॉय, जगत मगरोडया, कु माहीन गाजी व कु आज्ञा भगत यांचा समावेश आहे.

# आंतरराष्ट्रीय अध्यात्म ऑलिम्पियाड 200 जिल्ह्यांमध्ये आयोजन

## पाच श्रेणींमध्ये उमेदवारांची देशव्यापी नोंदणी सुरू; पत्र परिषद उद्योजक चंद्रकुमार जाजोदिया यांची माहिती

प्रतिनिधी २३ सप्टेंबर

**अमरावती :** वस्तुनिष्ठ परीक्षा वेद, उपनिषदे, रामायण, गीता, तसेच जैन, बौद्ध आणि शीख धर्मांवर आधारित असेल; सुमारे ३ कोटी रुपयांची पारितोषिके दिले जातील.

देशात प्रथमच अध्यात्म आणि संस्कृतीवर आधारित ऑलिम्पियाड आयोजित केले जात आहे. अशी माहिती पत्र परिषदेमध्ये ज्येष्ठ उद्योजक तथा समाजसेवक चंद्रकुमार उर्फ लप्पी सेट जाजोदिया यांनी दिली.

आंतरराष्ट्रीय अध्यात्म ऑलिम्पियाड परिषद (आयएसओ परिषद) विद्यार्थी, मुले, किशोरवयीन, तरुण आणि त्यांच्या पालकांमध्ये अध्यात्म, तत्त्वज्ञान, संस्कृती, मूल्ये आणि परंपरांबद्दल आवड निर्माण



करण्याच्या उद्देशाने या कार्यक्रमाचे आयोजन करत आहे. व्यापक भारतीय ज्ञान परंपरेचा समावेश असलेला एक सर्वसमावेशक अभ्यासक्रम विकसित करण्यात आला आहे. यामध्ये वेद, उपनिषदे, ब्रह्मसूत्र, रामायण, गीता, ऋषी परंपरा, संत परंपरा, जैन धर्म, बौद्ध धर्म, शीख धर्म आणि इतर सर्व भारतीय तत्त्वज्ञान, विचार आणि विचारप्रणाली यांचा समावेश आहे. गैर-भारतीय तत्त्वज्ञान, विचार आणि विचारप्रणालींवर एक प्रकरणही जोडण्यात आले आहे. हे पुस्तक हिंदी आणि इंग्रजीमध्ये अनुक्रमे "ए फॉर स्पिरिच्युॲलिटी" आणि "ए फॉर स्पिरिच्युॲलिटी" या शीर्षकांसह तयार करण्यात आले आहे.

आंतरराष्ट्रीय अध्यात्म ऑलिम्पियाड (ISO) साठी गेल्या अनेक महिन्यांपासून सुरू असलेली चाचणी यशस्वीरित्या पूर्ण झाली आहे. गणेश चतुर्थीला सुरू होणाऱ्या गणेशोत्सवाबरोबरच, ISO 2026-27 साठी देशव्यापी नोंदणी मोहीमही सुरू झाली आहे. नोंदणी थेट इंटरनॅशनल स्पिरिच्युअल ऑलिम्पियाड कौन्सिल, नोएडाच्या वेबसाइट <www.isocouncil.org> वर ऑनलाइन किंवा शैक्षणिक संस्थांमार्फत करता येईल.

विद्यार्थ्यांचे पालक देखील त्यांच्या स्वतःच्या स्वतंत्र गटांमध्ये सहभागी होऊ शकतात.

ISO 2026-27 साठी उमेदवारांची नोंदणी पाच श्रेणींमध्ये केली जाईल: गट C, D, E1, E2 आणि F. गट 8 मध्ये इयत्ता 6 वी ते 8 वीचे विद्यार्थी, गट D मध्ये इयत्ता 9 वी ते 12 वीचे विद्यार्थी आणि गट E1 मध्ये पदवीधरांचा समावेश असेल. पदव्युत्तर, संशोधन आणि डिप्लोमा अभ्यासक्रम करणाऱ्या विद्यार्थ्यांचे वाटप करण्यात आले आहे. विशेष म्हणजे, या विद्यार्थ्यांच्या पालकांसाठी 'गट फ' (Group F) नावाची एक स्वतंत्र श्रेणी तयार करण्यात आली आहे. गट अ आणि ब (इयत्ता १ ते ५) साठी नोंदणी पुढील आयएसओ सत्रात किंवा आवृत्तीत उपलब्ध होईल. अधिक तपशील वेबसाइटवर उपलब्ध आहे.

आयएसओ पूर्वपरीक्षा (ISO Prelims exam) भारतातील ३६ राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांमधील सुमारे २०० निवडक जिल्ह्यांमध्ये २९ ऑगस्ट, २०२७ रोजी एकाच दिवशी ऑफलाइन (ओएमआर शीट वापरून) घेतली जाईल. परीक्षेचे माध्यम हिंदी आणि इंग्रजी असेल. सर्व वर्गांसाठी पाठ्यपुस्तके देखील हिंदी आणि इंग्रजीमध्ये स्वतंत्र खंडांमध्ये तयार केली जात आहेत. ही पुस्तिका सर्व नोंदणीकृत उमेदवारांना त्यांच्या पत्त्यावर पाठवली जाईल. या पुस्तिकेत वस्तुनिष्ठ प्रकारचे प्रश्न (MCQs) देखील असतील. आयएसओ पूर्वपरीक्षेत या पुस्तकातील विविध प्रकरणे आणि नमुना प्रश्न व उत्तरांवर आधारित वस्तुनिष्ठ प्रश्न विचारले जातील.

# राजापेठ पोलीसांची उत्कृष्ट कामगिरी एका तडीपार इसमाला पकडले

प्रतिनिधी २३ सप्टेंबर

**अमरावती :** राजापेठ पोलीसांची उत्कृष्ठ कामगीरी केली. एका तडीपार इसमाला पकळुन त्यावर कारवाईकरण्यात आली. दिनांक 22.09.2026 रोजी वरीष्ठ पोलीस निरीक्षक, संदीप चव्हाण यांच्या आदेशाने डि बी पथकातील अंमलदार हे पोलीस स्टेशन हददीमध्ये कोणताही अनुचीत प्रकार घडू नये या करीता पेट्रोलींग करीत असतांना अमरावती शहर तसेच ग्रामीण परीसरातुन दोन वर्षाकरीता तडीपार असलेला इसम नामे भाग्येश त्रंबक जाने, वय २६ वर्षे, रा. भटवाडी हणुमान मंदीराचे बाजुला एम.आय. डी.सी रोड, अमरावती हा मिळुन आल्याने त्याचेवर कलम 142 महाराष्ट पोलीस कायदयान्वये कारवाई करण्यात आली आहे.





तरी सर्व नागरीकांना याव्दारे सुचीत करण्यात येते की, सार्वजनीक उत्सव काळामध्ये कोणताही उनुचीत प्रकार घडुन कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होणार नाही या करीता पोलीस स्टेशन राजापेठ यांनी लावलेल्या तडीपार यादी फलकामधील कोणताही तडीपार इसम हा दिसुन आल्याने पोलीस स्टेशन राजापेठ येथे कळवावे.

सदर प्रकरणी पोलीस स्टेशन राजापेठ येथे अपराध कमांक. 818/2026 कलम 142, 135 महाराष्ट्र पोलीस अधीनियम अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला.सदरची कारवाई राकेश ओला, पोलीस आयुक्त, श्याम घुगे, पोलीस उपायुक्त परि-2 . संजय खताळे, सहायक पोलीस आयुक्त, यांचे मार्गदर्शना खाली वरीष्ठ पोलीस निरीक्षक, संदीप चव्हाण, पोनी उमेश मुंढे, सपोनी नितीन शिंदे, पोहेकॉ मनीश करपे, पोहेकॉ पवन तिवारी, पोहेकॉ पंकज खटे, पोहेका रवी लिखीतकर, पोहेकॉ शशीकांत शेळके, पोकॉ अंकुश काळे, पोकॉ प्रशांत बेलोरकर, पोका अर्जुन कदम, पोकॉ शेख आबीद, पोकॉ अमोल खंडेजोड, पोकॉ आकाश यादव, पोकॉ रफीक खान, पोकॉ सतीश टपके, यांनी केली.

# विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास झाल्यानेच शिक्षणाचा उद्देश साध्य होईल - कुलगुरु डॉ. मिलींद बारहाते

## अमरावती विद्यापीठात दीक्षारंभ 2026 कार्यक्रम उत्साहात संपन्न

प्रतिनिधी २३ सप्टेंबर

**अमरावती :** विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास होऊन त्यांनी देशाचे एक सक्षम आणि जबाबदार नागरिक व्हावे, तरच खया अर्थाने शिक्षणाचा उद्देश साध्य होईल, असे प्रतिपादन कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांनी केले. संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या केंद्रीय प्रवेश समितीच्यावतीने 'दीक्षारंभ 2026' नवीन प्रवेशित विद्याथ्र्यांसाठी स्वागत समारंभ कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते, त्याप्रसंगी अध्यक्षस्थानावरुन ते बोलत होते. यावेळी व्यासपीठावर प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे, कुलसचिव डॉ. अविनाश असनारे, प्रमुख अतिथी म्हणून रिलायन्स फाउंडेशनच्या सीएसआर समन्वयक पायल भैसारे, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे



संचालक डॉ. नितीन कोळी, वित्त व लेखा अधिकारी सीए. पुष्कर देशपांडे, आंतर विद्याशाखीय अभ्यास शाखेच्या अधिष्ठाता डॉ. वैशाली गुडधे, विद्यार्थी विकास संचालक डॉ. राजीव बोरकर, केंद्रीय प्रवेश समितीचे अध्यक्ष डॉ. कपिल कांबळे आदी उपस्थित होते.

कुलगुरू पुढे म्हणाले, शिक्षणाचा मूळ उद्देश हा केवळ परीक्षा पास होणे किंवा पदवी मिळवणे नसून, त्यापलीकडे जाऊन एक चांगला माणूस व जबाबदार नागरिक तयार करणे आहे. आजच्या गतिमान जगात प्रत्येक क्षेत्रात टिकून राहण्यासाठी स्वत:मध्ये सकारात्मक बदल घडवून आणणे आणि लवचिकता निर्माण करणे गरजेचे आहे. नवीन शैक्षणिक धोरणानुसार विद्याथ्र्यांना पुस्तकी ज्ञानासोबतच प्रत्यक्ष कौशल्याधारित शिक्षण आणि इंटर्नशिप मिळण्यावर भर दिला जात आहे, त्यामुळे उद्योग आणि शैक्षणिक संस्थांमधील दरी कमी होऊन रोजगार निर्मितीला चालना मिळेल. संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ या विचारांना पुढे नेण्याचे आणि विद्याथ्र्यांमध्ये सामाजिक जाणीव निर्माण करण्याचे महत्त्वपूर्ण कार्य करत असल्याचेही त्यांनी याप्रसंगी सांगितले.

प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे यांनी नवीन प्रवेशित विद्याथ्र्यांचे स्वागत करुन विकसित भारत 2047 चे स्वप्न पूर्ण करण्यासाठी तरुणांचा सहभाग महत्वाचा असल्याचे सांगितले. तसेच आईवडिलांचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी नेहमीच प्रयत्नशील रहा, असे आवाहनही त्यांनी केले. मनोगत व्यक्त करताना कुलसचिव डॉ. अविनाश असनारे म्हणाले, विद्याथ्र्यांना शिक्षणातून मिळणारे ज्ञान आणि कौशल्ये हेच विद्याथ्र्यांचे भविष्य उज्ज्वल करू शकतात. त्यामुळे विद्याथ्र्यांनी शिक्षणाकडे केवळ एक औपचारिकता म्हणून न बघता, त्यामागील गांभीर्य समजून घेणे आवश्यक असल्याचेही ते म्हणाले. प्रमुख अतिथी पायल भैसारे यांनी रिलायन्स फाउंडेशनच्यावतीने दिल्या जाणाया पदवी आणि पदव्युत्तर पदवी शिष्यवृत्तीबद्दल विद्याथ्र्यांना सविस्तर माहिती दिली. तसेच विद्यापीठातील विविध विभागप्रमुखांनी यावेळी विभागाची माहिती दिली. विद्यापीठ गीताने कार्यक्रमाची सुरुवात झाली. कर्मयोगी श्री संत गाडगे बाबा यांच्या प्रतिमेचे पूजन, हारार्पण व दीपप्रज्वलन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

# सराईत गुन्हेगार जयेश उर्फ तात्या राजेंद्र गायकवाड दोन वर्षाकरीता अमरावती शहर व जिल्ह्यातून हद्दपार

प्रतिनिधी २३ सप्टेंबर

**अमरावती:** सराईत गुन्हेगार जयेश उर्फ तात्या राजेंद्र गायकवाड रा. महात्मा फुले नगर, नवसारी अमरावती यास दोन वर्षाकरीता अमरावती शहर व जिल्हयातुन हद्दपार करण्यात आले.

पोलीस आयुक्त अमरावती यांचे आदेशाने पोलीस स्टेशन गाडगेनगर अमरावती शहर हद्दीतील वारंवार गुन्हे करण्याचे सवयीचे असणारा गुन्हेगार, तसेच गुन्हे अभिलेखावर मोठ्या प्रमाणावर गुन्हे असणारा रेकॉर्ड वरील गुन्हेगार जयेश उर्फ तात्या राजेंद्र गायकवाड, वय 22 वर्ष, रा. महात्मा फुले नगर, नवसारी अमरावती याचे विरूध्द पोलीस स्टेशन गाडगेनगर अमरावती शहर येथील अभिलेखावर गंभीर स्वरूपाचे गुन्हे असुन त्याचेवर दुखापत करणे, जिवानीशी ठार मारणे, अश्लील शिवीगाळ करणे, मारण्याची धमकी देणे



या गुन्हयांची नोंद आढळुन आली. त्याचेवर यापुर्वी वेळोवेळी प्रतिबंधक कार्यवाही करून सुध्दा त्याचे मध्ये सुधारणा झाली नाही. त्याचे अभिलेख पाहुन हद्यपार प्रस्ताव तयार करून हद्यपार करण्यात आले आहे.

सहाय्यक पोलीस आयुक्त निलेश ब्राम्हणे गाडगेनगर विभाग अमरावती शहर यांचे मार्फतीने पोलीस उपायुक्त यशवंत सोळंके साहेब परीमंडळ 1 अमरावती यांचे कडे नमुद गुन्हेगार यास पोलीस आयुक्तालय हद्दीतुन हद्यपार करण्याकरीता प्रस्ताव तयार करून पाठविले असता दि. 19/09/2026 रोजी जयेश उर्फ तात्या राजेंद्र गायकवाड, वय 22 वर्ष, रा. महात्मा फुले नगर, नवसारी अमरावती यास दोन वर्षाकरीता आदेश पारीत झाल्याने नमुद हद्यपार इसमास दि. 21/09/2026 रोजी आदेश तामील करून पोलीस आयुक्तालय व अमरावती जिल्हा हद्दीतुन पो. स्टे. जरीपटका जि. नागपुर येथे हद्यपार करण्यात आले आहे.

सदरची कार्यवाही राकेश ओला पोलीस आयुक्त, यशवंत सोळंके,पोलीस उपायुक्त, परीमंडळ -1 , निलेश ब्राम्हणे, सहायक पोलीस आयुक्त गाडगेनगर विभाग अमरावती यांचे मार्गदर्शना खाली वपोनि गोरखनाथ जाधव, पोनि (गुन्हे) प्रमोद पाचकवडे, पोनि (प्रशासन) विजया पंधरे, पोहेकों विनोद इंगळे, सचिन मोहोड व डि. बी. पथक प्रमुख पोउपनि. सागर ठाकरे, पोहेकों निलेश जुनघरे, पोहेकों अमोल यादव, नापोकों विनोद मालवे, आशीष ठाकरे, पोकों सिध्दार्थ श्रृंगारे, गुलरेज खान, सचिन गौरखेडे यांनी केलेली आहे. व अश्याच प्रकारे अभिलेखावरील जास्तीत जास्त गुन्हेगार यांचे वर त्यांचे अभिलेख पाहुन वेळोवेळी अश्याच प्रकारची प्रतिबंधक कार्यवाही करण्यात येणार आहे.

# महावितरणच्या विविध सेवा, सौर योजनांचा लाभ तालुक्यात एकाच छताखाली उपलब्ध

## वीजग्राहकांसाठी 'सेवा सेतू' व 'सेवा संकल्प अभियानाला प्रारंभ

प्रतिनिधी २३ सप्टेंबर

**अमरावती:** प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या सार्वजनिक व घटनात्मक पदावरील कार्यकाळास २५ वर्षे पूर्ण होत असल्याच्या औचित्याने वीजग्राहकांना अधिक वेगवान आणि सुलभ सेवा देण्यासाठी प्रत्येक तालुक्यात महावितरणकडून विशेष सेवा कक्ष उभारून येत्या १७ ऑक्टोबर २०२६ पर्यंत 'सेवा सेतू' आणि 'सेवा संकल्प अभियान' राबविण्यात येत आहे.

मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव तथा महावितरणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. लोकेश चंद्र यांच्या नेतृत्वात महावितरणकडून या दोन्ही अभियानाला गुरुवार (दि. १७ सप्टेंबर) पासून प्रारंभ झाला. संचालक श्री. धनंजय औंढेकर (संचालन) व श्री. राजेंद्र पवार (मानव संसाधन) यांनी व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे अभियानाच्या अंमलबजावणीचा मंगळवारी (दि. २२) आढावा घेतला व हे अभियान आणखी गतीमान करण्याची सूचना केली. यावेळी कार्यकारी संचालक (मानव संसाधन) श्री. परेश भागवत यांनी अभियानाची सविस्तर माहिती दिली. या बैठकीला कार्यकारी संचालक श्री. भुजंग खंदारे, श्री. अंकुर कावळे, श्री. सुनील काकडे, श्री. संदीप पाटील, श्री. चंद्रमणी मिश्रा यांच्यासह राज्यातील मुख्य अभियंते व अधीक्षक अभियंते उपस्थित होते. या अभियानात उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या शहरी व ग्रामीण भागातील प्रत्येकी दोन उत्कृष्ट मंडलांचा विशेष गौरव करण्यात येणार आहे.

सेवा संकल्प अभियान अंतर्गत प्रत्येक तालुक्यात विशेष सेवा कक्ष सुरु करण्यात आले आहेत. पीएम सूर्यघर मोफत वीज योजना, स्वयंपूर्ण महाराष्ट्र आवासीय रूफटॉप सोलर (स्मार्ट) योजना, मागेल त्याला सौर कृषी पंप योजना आणि मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.० या अंतर्गत जागेवरच ऑनलाईन अर्ज नोंदणी, योजनेचे आर्थिक फायदे व सौर संच बसविण्याची प्रक्रिया याबाबत मार्गदर्शन करण्यात येत आहे. योजनेसाठी आवश्यक कागदपत्रे, कर्जाची सुविधा, अंदाजित खर्च यासाठी स्थानिक बँक प्रतिनिधी आणि निवडसूचीवरील सौर कंत्राटदार प्रतिनिधींशी थेट संपर्क व समन्वय करण्यात येत आहे. कर्जाची देखील सुविधा उपलब्ध होत आहे. यासह सौर योजनांची माहिती देण्यासाठी प्रत्येक तालुक्यात स्वतंत्र नोडल अधिकारी नियुक्त करण्यात आले आहे. तसेच त्रुटींची पुर्तता करून प्रलंबित अर्जांवर त्वरित कार्यवाही करण्यात येत आहे.

या सेवा सेतू अभियानात नवीन घरगुती वीजजोडणी देणे, नादुरुस्त रोहित्र विनाविलंब बदलून देणे, वीज बिलावरील नावात बदल करणे, मंजूर भार बदलणे, बिलिंगविषयक तक्रारींचे निवारण करणे, प्रलंबित तक्रारींचे निवारण तसेच विद्युत सुरक्षेसाठी वीज यंत्रणेमध्ये आवश्यकतेनुसार स्पेसर बसवणे, इतर तांत्रिक उपाययोजना, वीजयंत्रणेची देखभाल व दुरुस्ती आदींना वेग देण्याचे निर्देश क्षेत्रीय कार्यालयांना देण्यात आले. सेवा सेतू व सेवा संकल्प अभियानात एकाच छत्राखाली उपलब्ध सर्व सेवा व सुविधांचा लाभ घ्यावा असे आवाहन महावितरणकडून करण्यात आले आहे.


हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक प्रदीप पुंडलिकराव देशमुख यांनी सायरन ऑफसेट प्रिंटर्स एमआयडीसी क्र. २ पोलिस स्टेशन समोर ता. जि. अकोला येथे मुद्रित करून सिटी न्युज सुपरफास्ट कार्यालय ख्रिस्त कॉलनी, ट्रेझरी ऑफिस नजीक, प्रफुल घवळे यांची बिल्डिंग अमरावती, C/0 गॅलक्सी बार जवळ येथे प्रकाशित केले. ▪ **मुख्य संपादक : प्रदीप पुंडलिकराव देशमुख** ▪ **संपर्क** - 0724-2435573, 2444774 - email- citynewss80@gmail.com, RNI No.-MAHMAR/26/A2977 , RRC Helpline No. 8484842135